# प्रेस नोट दिनांक १७/११/२०१७

## आणखी ५ कुंटणखाने सीलबंद – पोलीस आयुक्तांची धडक कारवाई

मा.श्रीमती रश्मि शुक्ला, पुणे शहर यांनी पोलीस आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारल्यापासून पुण्यामध्ये चालत असलेल्या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्याच अनुषंगाने पुणे शहरातील अल्पवयीन व सज्ञान मुलींकडून वेश्याव्यवसाय चालत असणा-या ठिकाणावर धाडी टाकून विविध पोलीस ठाण्यात ईटपा कायद्यांतर्गत पोलीस स्टेशनकडून व गुन्हे शाखेकडून गुन्हे दाखल केले होते. धाडी टाकलेल्या ठिकाणी पुन्हा वेश्याव्यवसाय सुरु होऊ नये म्हणून शहरातील विविध पोलीस ठाण्याकडून सदर कुंटणखाने सिलबंद करणेबाबतचे प्रस्ताव मा.पोलीस आयुक्त यांचेकडे पाठविण्यात आले होते.

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना महाराष्ट्र शासन निर्णय राजपत्र असाधारण भाग-१ मध्य उपविभाग क्रं.पीपीए/६०८/१५७७/प्रकृ-५१३/विशा-६, मंत्रालय, मुंबई-३२, दि.३१/०७/२००९ अन्वये अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम (१९५६) तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी पुणे पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रासाठी कार्यकारी दंडाधिकारी व अति. जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम (१९५६) मधील कलम १८ व २० च्या प्रयोजनासाठी अति.जिल्हाधिकारी यांचे अधिकार देखील प्रदान करण्यात आले आहेत. या अधिकाराचा वापर करुन मा.पोलीस आयुक्त यांनी पुणे शहरातील **एकुण ५ कुंटणखाने प्राप्त प्रस्तावानुसार पैकी, ३ कुंटणखाने हे तीन वर्षासाठी व २ कुंटणखाने हे एक वर्षासाठी सीलबंद करण्याचे आदेश निर्गमित केले.** त्या अनुषंगाने संबंधित पोलीस ठाण्यांना खालील कुंटणखाने सीलबंद करण्याचे आदेश दिलेले आहेत.

| अ.क्रं. | पोस्टे गु.र.नं./कलम | आरोपीचे नांव / पत्ता | कुंटणखाना सीलबंद केलेला पत्ता | सीलबंद आदेश दिनांक व कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | फरासखाना पोस्टे गु.र.नं. १६७/२०१६ भादंवि कलम ३४४,३६३,३७०,३७२,३७३,३४, बालकांचे लैंगिक अत्याचार संरक्षण अधिनियम कलम १२ व पिटा ॲक्ट कलम ३,४,५,६,७ अन्वये | श्रीमती अमिना लक्ष्मण शर्मा, रा.घर नं.९९०, तिसरा मजला, डिस्को बिल्डींग, बुधवार पेठ, पुणे. | घर नं.९९०, तिसरा मजला, डिस्को बिल्डींग, बुधवार पेठ, पुणे. | १६/११/२०१७ तीन वर्षासाठी |
| २ | फरासखाना पोस्टे गु.र.नं. ११/२०१७ भादंवि कलम ३२३, ५०४, ३४, बालकांचे लैंगिक अत्याचार संरक्षण अधिनियम कलम १२ व पिटा ॲक्ट कलम ३,४,५,६,७ अन्वये | श्रीमती रत्ना अतुल सिंग, रा.घर नं.९८६, दुसरा मजला, माचिस बिल्डींग शेजारी, बुधवार पेठ, पुणे. | घर नं.९८६, दुसरा मजला, माचिस बिल्डींग शेजारी, बुधवार पेठ, पुणे. | १६/११/२०१७ तीन वर्षासाठी |
| ३ | फरासखाना पोस्टे गु.र.नं. ५१/२०१७ भादंवि कलम ३७६,३४४,३२३,३४, बालकांचे लैंगिक अत्याचार संरक्षण अधिनियम कलम ४,६,१७ व पिटा ॲक्ट कलम ३,४,५,६,७ अन्वये | श्रीमती . मन्नू ऊर्फ सुशिला मनबहाद्दुर तमांग, रा.घर नं.१०३६, फ्लॅट नं.३, ए तिसरा मजला, वेलकम टू अपार्टमेंट, क्रांती चौक, बुधवार पेठ, पुणे. | रा.घर नं.१०३६, फ्लॅट नं.३, ए तिसरा मजला, वेलकम टू अपार्टमेंट, क्रांती चौक, बुधवार पेठ, पुणे. | १६/११/२०१७ तीन वर्षासाठी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | फरासखाना पोस्टे गु.र.नं. ५६/२०१६ भादंवि कलम ३४४,३६३,३६६,३७०,३४ व पिटा ॲक्ट कलम ३,४,५, ६,७ अन्वये. | श्रीमती लक्ष्मी भिमसिंग तमांग रा. घर नं.१०३६ दुसरा मजला, वेलकम टू बिल्डींग (स्टार बिल्डींग) बुधवार पेठ, पुणे. | घर नं.१०३६ दुसरा मजला, वेलकम टू बिल्डींग (स्टार बिल्डींग) बुधवार पेठ, पुणे. | **१६/११/२०१७** एक वर्षासाठी |
| ५ | फरासखाना पोस्टे गु.र.नं. ५६/२०१६ भादंवि कलम ३४४,३६३,३६६,३७०,३४ व पिटा ॲक्ट कलम ३,४,५, ६,७ अन्वये. | श्रीमती सीमा मणी नायर, घर नं.९९०/९१, फ्लॅट नं.२१०, डिस्को बिल्डींग, तिसरा मजला बुधवार पेठ, पुणे. | घर नं.९९०/९१, फ्लॅट नं.२१०, डिस्को बिल्डींग, तिसरा मजला बुधवार पेठ, पुणे. | **१६/११/२०१७** एक वर्षासाठी |

यापुर्वी मा.पोलीस आयुक्त यांनी **यावर्षी आत्तापर्यंत २० कुंटणखाने सीलबंद करण्याची धडाकेबाज कारवाई केलेली आहे.** वरील कुंटणखान्या व्यतिरिक्त आणखीन कांही शहरातील कुंटणखाने सीलबंद करण्याची कार्यवाही चालू आहे.